'Research Journey' International Multidisciplinary E- Research Journal
Vol. 1 Issue. 4
ISSN :2348-7143 (Online)
Oct. - Dec. - 2014

# जागतिकीकरण आणि भारतीय अर्थव्यवस्थेचे बदलते स्वरूप

प्रा.डॉ.पी.एम.भागडे
प्र.प्राचार्य,
कला व वाणिज्य महाविद्यालय, जव्हार
जि. ठाणे. महाराष्ट्र, भारत

**प्रास्ताविक :**

भारतात आर्थिक सुधारणांचे पर्व सुरू होऊन 23 वर्ष होत आली आहेत. अख्खे जग एक ग्लोबल खेडे (Global Village) बनविण्याचा ध्यास प्रगत देशांनी घेतला. याच काळात भारतातील अर्थतज्ज्ञ आणि सुधारणावादयांना भारत आर्थिक महासत्ता 'Super Economics Power' बनू शकतो अशी स्वप्न पडू लागली. या स्वप्नपूर्तीच्या गेल्या दोन दशकात अनेक आरिष्टे आणि अडथळे पार करीत भारतीय अर्थव्यवस्था मार्गक्रमण करीत आहे. आपल्यासाठी ज्या सुधारणा नवीन होत्या त्या जगाने व अनेक विकसनशील देशांनी यापूर्वीच स्वीकारून त्याचे फायदे घेतले होते. अगदी चीन सारखा कम्युनिस्ट देशही यात मागे नव्हता. आपल्यालाही या आर्थिक सुधारणा अंमलात आणून जागतिक अर्थव्यवस्थेचा हिस्सा बनणे भाग पडले. याचा परिणाम म्हणून सर्वसामान्य माणसाच्या विनिमय व्यवहारात अमुलाग्र बदल घडून आल्याचे दिसते. जीवनव्यवहार मुळापासून बदलू लागल्याने ज्ञान, संस्कृती, समाजरचना, अर्थकारण आणि राजकारण यात बदल होत आहेत. या सर्व क्षेत्रात होणा–या बदलांचे चांगले–वाईट परिणाम आपल्या एकूण अर्थव्यवस्थेवर होत आहेत. निःसंशयपणे कबूल करायचे तर आर्थिक जागतिकीकरणाचाच हा परिणाम असल्याचा प्रत्यय मिळतो. सुधारणा पर्वाच्या या दोन दशकात झालेल्या आर्थिक बदलांचा आढावा घेणे हा हेतू मनाशी ठेवून या शोधनिबंधाची योजना केली आहे.

सन १९९०–९१ मध्ये भारतात जो अभूतपूर्व आर्थिक पेचप्रसंग निर्माण झाला त्यातून मार्ग काढण्याचा प्रयत्न म्हणून नवीन आर्थिक सुधारणांना चालना मिळाली. आर्थिक नियोजनाची चार दशके लोटल्यानंतर प्रथमतःच अशी स्थिती निर्माण झाली की, ज्यामूळे वित्तीय तुटीचे प्रमाण कमालीचे वाढले, परकीय गंगाजळीचा साठा आटत जाऊन न्यूनतम पातळीला पोहचला, लघुउदयोग बंद पडू लागले, रोजगार संधी कुंठीत होऊन बेरोजगारांचे प्रमाण वाढू लागले, भरमसाठ भाववाढ झाली, देशावर परकीय कर्जाचा भार वाढत जाऊन देश कर्ज सापळयात अडकला, या सर्वांचा परिणाम म्हणून आपल्या देशाची जागतिक पातळीवर 'पत' धोक्यात आली. नाणे निधी, जागतिक बॅंक, आशियाई

विकास बॅक यासारख्या जागतिक स्तरावरील संस्थांनी भारतासाठी करावयाच्या मदतीचा हात आखडता केला. या आर्थिक आरिष्टातून सावरून देशाची अर्थव्यवस्था विकास वाटेवर रूळविण्यासाठी जागतिकरणाच्या माध्यमाने नवीन आर्थिक सुधारणा अंमलात आणणे भाग पडले. नाणे निधी आणि जागतिक बॅकेने आपल्याला वित्तीय मदत देतांना तशा प्रकारच्या सुधारणांची सुरूवात करण्यासाठी सूचक अटी घातल्या आणि आपली अर्थव्यवस्था परस्थितीची अपरिहार्यता म्हणून का असेना पण नवीन बदल स्वीकारू लागली. अर्थव्यवस्थेच्या या बदलत्या स्वरूपास एकत्रितपणे 'नवीन आर्थीक सुधारणा' असे म्हणता येईल.

भारताने स्वीकारलेल्या नवीन सुधारणांचे उदारीकरण, खासगीकरण आणि जागतिकीकरण हे ठळक तीन पैलू आहेत. या सुधारणांच्या पहिल्या टप्प्यावर आपण संरचनात्मक समायोजनाचा भाग (Structural Adjustment) म्हणून आर्थिक रचनेत काही मूलभूत बदल स्वीकारले. मुळातच तत्कालीन संकटातून मार्ग काढण्याचा प्रयत्न असे समायोजन आवयक होते. संरचनात्मक समायोजनाचा भाग म्हणून

- भारतीय अर्थव्यस्था उदारीकरणाकडे नेतांना भारतीय रूप्याचे १८ ते १९ टक्क्यांनी अवमूल्यन करणे. (उदारीकरण)
- भारतीय सार्वजनीक उद्योगातील कुंठित अवस्था दूर करून नफा वाढविणेसाठी सार्वजनिक क्षेत्रातून निर्गुंतवणूक करणे. (खासगीकरण)
- भारतीय अर्थव्यवस्थेत निर्माण झालेली भांडवलाची अनुपलब्धता भरून काढण्यासाठी परकीय थेट गुंतवणूकीला (FDI-Foreign Direct Investment) मुभा देणे (जागतिकीकरण) आणि
- भारतीय अर्थव्यवस्थेत गुंतवणूकीचे प्रमाण वाढवून अर्थव्यवस्था गतिमान करण्यसाठी विदेशी संस्थागत गुंतवणूक (FDI-Foreign Institutional Investment) व अनिवासी भारतीयांना (NRI-Non Residential Indians) गुंतवणूकीवर सवलती देणे.

या प्रमुख चार टप्प्यातून आपली अर्थव्यवस्था मार्गक्रमण करतांना नवीन सुधारणांचा अंमल सुरू झाला. यावूनच देशात नवे रोजगार येतील आणि आर्थिक प्रगतीचा वेग वाढेल असे गृहीत धरले. त्यानुसार आर्थिक सुधारणांची ओळख सर्व क्षेत्रांना व्हावी आणि या सर्व क्षेत्रातील घटकांची मानसिकता सुधारणा स्वीकारण्याची बनावी या दृष्टीने पहिल्या टप्प्यात प्रयत्न करण्यात आले (१९९१ ते १९९८

सुधारणांचा पहिला टप्पा) आणि १९९८ नंतरच्या दुस—या टप्प्यात आर्थिक सुधारणांचे फलिते अपेक्षित धरण्यात आली सध्या आर्थिक सुधारणा गतिमान झाल्या असून त्याचा लाभार्थी वर्गही मोठया संख्येने वाढला आहे. यामुळेच बाजारपेठ, शहरीकरणाला प्रोत्साहन मिळून एकूण अर्थव्यवस्थेचा तोंडवळा आधुनिक बनत असल्याचे दिसून येते. मेक ईन इंडिया हा त्याचा एक भाग आहे.

**आर्थिक सुधारणांची उद्यिष्टे :**

भारतात आर्थिक सुधारणांचे पर्व सुरू होण्यापूर्वी आर्थिक विकासाची संपूर्ण जबाबदारी सरकारचीच असल्याचे दिसून येते. मूळातच पर्वातील फसलेली धोरणांचा परिपाक म्हणूनच भारतावर आर्थिक आरिष्टे ओढावल्याचे स्पष्ट झाले. म्हणूनच नव्या नितीचा भाग स्वकारूनच आर्थिक विकास प्रक्रियेत सरकार सोबत खासगी क्षेत्र आणि विदेशी सहाय्य यांची भागीदारी वाढण्यावर भर देण्यात आला. विकासाच्या दृष्टीने अपेक्षित बदल सरकार, खासगी क्षेत्र आणि विदेशी आर्थिक व तांत्रिक सहाय्य यांच्या समन्वयातून घडवून आणणे हाच मूळ गाभा आर्थिक सुधारणांचा आहे. सरकार, योजना आयोग, वित आयोग आणि मध्यवर्ती बॅक (RBI) या सर्वोच्च संस्थांचे आर्थिक सुधारणा संदर्भात कृतीशिल योगदान राहिले आहे. या सर्व संस्थांच्या समन्वयाने आर्थिक सुधारणांची पुढील उद्यिष्टांवर करण्यात आली आहेत.

**वित्तीय तूट कमी करणे :**

वाढती वित्तीय तूट ही भारतीय अर्थव्यवस्थेची जटिल समस्या राहिली आहे. वित्तीय तुटीच्या सातत्यामूळे भाववाढ, सार्वजनिक कर्जाचा वाढता बोजा, सरकारी उत्पन्नात घट असे मूलभूत प्रश्न निर्माण झाल्याने आर्थिक विकासाची वाटचाल मंदावलेली दिसून येते. वित्तीय तुटीने परिसीमा गाठल्यानेच १९९१ चे आर्थिक आरिष्ट उभे राहिले आणि संपूर्ण देशाला आर्थीक चणचणीला सामोरे जावे लागले. बचत, गुंतवणूक, भांडवल वृध्दी या दृष्टीने ही बाब अडथथ्याची ठरत होती. म्हणूनच वित्तीय तूट व त्यातून निर्माण झालेल्या आर्थिक प्रश्नांची श्रृंखला खंडित करून विकास मार्ग सर्वसमावेशक बनविण्याच्या हेतूने नवीन आर्थिक सुधारणा स्वीकरण्यात आल्या.

**निर्गुंतवणूक धोरणास चालना (खासगीकरण) :**

भारत सरकार हा सर्वाम मोठा उद्योजक असता तरी उद्योग क्षेत्राची १९९१ पर्यंतची कामगिरी सर्वसाधारणच होती. देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरूंनी देषातील उद्योगधंदयाना 'आर्थिक विकासाचे मंदिरे' असे संबोधले होते. देशातील नोकरशाहीचा संथ कारभार (पांढरे हत्ती), लालफितीचा अथथळा, वाढता राजकीय हस्तक्षेप, तोटयातील उपक्रमांची वाढती संख्या आणि अकार्यक्षमता यासारखे अनेक दोष सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांमध्ये दिसून आले. हे सर्व दोष टाळून

सार्वजनिक क्षेत्राच्या बरोबरीने खासगी क्षेत्राला औद्योगिक विकासात वाव मिळावा आणि सरकारला इतर अग्रक्रमाच्या जबाबदा–यांसाठी योगदान देता यावे या हेतून निर्गुंतवणूक धोरणास चालना देण्याचे ठरविले. सरकारने गुंतविलेला पैसाा खुला व्हावा आणि त्याचा विनियोग ग्रामीण भागाचा विकास व पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी करता यावा यासाठी निर्गुंतवणूकीवर भर देण्यात आला.

**नव उद्योजकतेला वाव देणे :–**

भारतात औद्योगिक संपत्तीचे विषम वाटप झालेले आहे. हे मुठभर बडया औद्योगिक घराण्यांच्या हाती केंद्रित झालेल्या औद्योगिक सत्तेवरून दिसून येते. प्रादेषिक तत्वावरील समतोल औद्योगिक विकास, उद्योगधंद्याचे विकेंद्रीकरण, औद्योगिकीकरणाव्दारे रोजगार व स्वयंरोजगाराला चालना, भांडवल निर्मिती, उच्च गुणवत्ता व दर्जा आणि कार्यक्षमतेच्या कसोटीवरील उद्योजकता अशी विविध उदिष्टे समोर ठेऊन औद्योगिक सुधारणांवर भर देण्यात आला. सर्वसाधारणपणे १९५६ च्या औद्योगिक धोरणानुसार त्यात वेळोवेळी बदल करून १९९० पर्यंतचा औद्योगिक विकास झालेला दिसून येतो. नवीन सुधारणांचा भाग म्हणून २४ जूलै १९९१ ला नवे औद्योगिक धोरण स्वीकारण्यात आले. औद्योगिक परवाना पध्दतीतील क्लिष्टता, जाचक अटी व नियम दूर करून नोकशाहीचे प्रस्थ कमी करणे आणि लायसन्स–परमीट राज हटविणे या हेतून ज्या नवीन सुधारणा स्वीकरण्यात आल्या त्यांनाच 'उदारीकरण' म्हणून ओळखले गेले. उदारीकरणाचा भाग म्हणून देशहिताचे उपक्रम, संरक्षण (Defence) व पर्यावरण वगळता इतर सर्व उद्योगांची परवाना पध्दतीतून मुक्तता करण्यात आली. देशाच्या दृष्टीने महत्वपूर्ण असलेले ६ उपक्रम वगळता सर्व उपक्रम खासगी क्षेत्रासाठी खुली करण्यात आली. थोडक्यात औद्योगिक संस्कृती निर्माण करून नवउद्योजकतेला वाव देणे, देशासमोरील बेरोजगारी, भांडवली गुंतवणूक या समस्या सोवून भारतीय उद्योगांची जागतिक स्तरावरील स्पर्धाक्षमता वाढावी या हेतून नवीन औद्योगिक सुधारणांची सुरूवात करण्यात आली.

**जागतिक अर्थव्यवस्थेची सांगड घालणे (जागतिकीकरण) :–**

खुल्या आर्थिक धोरणांचा भांडवल, तंत्रज्ञान, मनुष्यबळ आणि वस्तू व सेवा या संदर्भातील मुक्त देवाण–घेवाण असा अर्थ असून यालाच 'जागतिकीकरण' असे म्हणतात. यामुळे आपली अर्थव्यवस्था जगातील इतर अर्थव्यवस्थांषी जोडली जाते. भारतीय अर्थव्यवस्था खुली करून जागतिक अर्थव्यवस्थेशी जोडणे व त्यातुन दूर्मिळ तंत्रज्ञान, भांडवल, कुशल मनुष्यबळ उपलब्ध करणे या हेतून नवीन सुधारणांवर भर देण्यात आला. जागतिकीकरणामुळे उपलब्ध होणा–या विविध संधीचा लाभ घेता यावा आणि त्याव्दारे अर्थव्यस्था सक्षम व्हावी यासाठी नवीन आर्थिक सुधारणा आवश्यक मानण्यात आल्या.

ISSN :2348-7143 (Online)
Oct. - Dec. - 2014

**सुधारित आयात निर्यात धोरण :–**

कोणत्याही अर्थव्यस्थेच्या दृष्टीने 'व्यापार' हे विकासाचे इंजिन मानण्यात येते. जागतिक बाजारपेठेतील व्यापाराचे लाभ घेता यावेत म्हणून आंतरराष्ट्रीय व्यापारात वृध्दी होणे आवशक असते. आंतरराष्ट्रीय व्यापाराचे लाभ घेता यावेत, व्यवहारतोलातील असमतोल दूर व्हावा (Balance of Payment) आणि जागतिक स्पर्धेत टिकण्याची क्षमता वृध्दीस लागावी या देतूने व्यापार धोरणात बदल करणे आवश्यक होते. नवीन आयात–निर्यात धोरणानुसार आयात पर्यायीकरण (Import Substitution) आणि निर्यात प्रोत्साहन (Export Promotion) स्वीकारण्यात आलेत. 'सेवा प्रधान अर्थव्यस्था' (Service Based Economy) ही आधुनिक जगाची विकासाची पूर्व अट बनत असून ही बाब लक्षात घेवून व्यापार आघाडीवर सुधारित आयात–निर्यात धोरण राबविण्याचे ठरले.

**वित्तीय क्षेत्रातील सुधारणा :–**

अर्थव्यवस्थेला 'रसद' पुरविणारे क्षेत्र म्हणून वित्तीय क्षेत्राची भमिका महत्वपूर्ण ठरते. मध्यवर्ती बॅक, व्यापारी बॅंका, वित्तीय संस्था, नाणेबाजार आणि भांडवल बाजार या सर्वांचे मिळून देषाचे वित्तीय क्षेत्र बनते. अल्प विकसीत नाणेबाजार, मर्यादित भांडवल बाजार, दोशपूर्ण व्यापारी आणि सहकारी बॅंकिंग यामूळे वित्तीय क्षेत्र अर्थव्यवस्थेवरील इतर क्षेत्रांची मागणी पूर्ण करण्याचे क्षमतेचे नव्हते. वित्तीय क्षेत्राचा विकास सुदृढ पायावर आणि सर्वकश असा व्हावा या हेतूने वित्तीय सुधारणांची आवश्यकता होती. यासाठी नरसिंह समितीच्या बॅंकिंग रिफॉर्मस प्रमाण मानण्यात आल्या आणि १९९१ व १९९८ अशा दोन टप्प्यात या सुधारणा स्वीकारण्यात आल्या. थोडक्यात सामर्थ्यशाली व स्पर्धाषिल वित्तीय क्षेत्र निर्माण व्हावे या हेतूने नवीन सुधारणांचा भाग म्हणून वित्तीय सुधारणांवर भर देण्यात आला.

**नवीन सुधारणांचे परिणाम :–**

भारताने आर्थिक सुधारणा कार्यक्रमांशी अंमलबजावणी गेल्या दोन दशकांत केलेली असती तरी त्याची सकारात्मक फलिते ख–या अर्थाने नव्या सहस्त्रकाच्या पहिल्या दशकात मिळू लागली आहे. अर्थात नवीन सुधारणांचे परिणाम संमिश्र स्वरूपाचे असून त्याचे समग्र मूल्यमापन केले असता जागतिक अर्थव्यवस्थेत भारतीय अर्थव्यवस्थेने स्वतंत्र ठसा उमटविल्याचे आशादायक चित्र समोर येते. नव्या शतकाच्या सुरूवातीस डॉ. अव्दूल कलाम, माजी राष्ट्रपतींनी देषातील तरूणांसह आपल्या सा–यांना सन २०२० मध्ये भारत हा जागतिक स्तरावरील 'महासत्ता' बनेल असे स्वप्न दाखविले. गतवर्षात (२०१०) जगभरातील पाच बडया राष्ट्रांच्या प्रमुखांनी भारतात येऊन भारताच्या भरारीचे केलेले कौतुक हे त्या स्वप्नपूर्तीच्या दिशेने होत असलेल्या वाटचालीवरचेच एक दमदार पाऊल ठरले

आहे. विशेष म्हणजे जगातील दोन महासत्तांच्या प्रमुखांनी म्हणजेच अमेरिकेचे राष्ट्रध्यक्ष बराक ओबामा आणि चीनचे अध्यक्ष बेन जिआबाओ यांना आपल्या देशात येऊन भारताच्या प्रगतीला 'सलाम' करावासा वाटला ही अभिमानास्पद अषीच बाब आहे. भारताकडून विविध क्षेत्रात सहकार्याची अपेक्षा या राष्ट्रप्रमुखांनी केलेली आहे. १९९७ च्या दक्षिण आशियाई संकटाच्या (South Asian Crisis) काळात आणि २००७ नंतरच्या जागतिक मंदीच्या (World Depreciation) स्थितीत भारतीय अर्थव्यवस्थेने आर्थिक संकटांचा योग्य मुकाबला करून आपली अर्थव्यवस्था स्थिर पायावर उभी करत आर्थिक वाढीची नवनवी शिखरे गाठली. हेच नवीन सुधारणांचे निर्धोक अंमलबजावणीचे घोतक ठरले आहे. नव्या सुधारणारूपी बदलांशी जुळवून घेण्यासाठी अर्थव्यस्थेच्या विराधाभासी स्वरूपामुळे मोठा काळ लागलेला असला तरी विकासासंदर्भात अर्थव्यवस्थेत एकूणच उत्साही आणि आशादायक स्थिती असल्याचे दिसून येते. शासन, उ़द्योगजगत, धोरणकर्ता संस्था, विविध क्षेत्र आणि समाज या सर्व घटकांनी नवीन सुधारणांना अनुकूल प्रतिसाद दिल्याने भारतीय अर्थव्यवस्था विकासाच्या दिशेने वेगाने झेप घेत आहे. या संदर्भात पुढील ठळक बाबी आर्थिक प्रगतीची साक्ष देणा—या आहेत.

**वित्तीय सक्षमता :—**

१९९१ च्या आर्थिक आरिष्टाच्या काळात RBI च्या तिजोरित खडखडाट होता, परकीय चलन साठा न्युनतम पातळीला होता. आज आपली परकीय गंगाजळी ३०० अब्ज डॉलरवर झेपावली असून त्यात दिवसेंदिवस भर पडत आहे. IMF ने भारताचा 'पतदार देश' म्हणून गौरवपूर्ण उल्लेख केला असून २० वर्षापूर्वी कर्जसापळयात उडकलेला देश आज विकसीत आणि विकसनषील देशांसाठी 'धनको' ची भूमिका बजावत आहे. अर्थात अर्थव्यवस्थेची चौफेर कामगिरीमुळेच हे शक्य झाले आहे.

भांडवलाची दुर्मिळता असलेला भारताचा भांडवली बाजार जगात 'चौथ्या' क्रमांकावार आहे. परदेशी गुंतवणुक 'दोन लक्ष कोटींच्या' आसपास झालेली आहे. विदेशी वित्तीय संस्था, विदेशी संस्थागत गुंतवणूक (FII) आणि अनिवासी गुंतवणूकदारांनी (NRI) भारतीय बाजारात मोठी गुंतवणूक केल्याने शेअर बाजाराने २८ हजारांचा टप्पा ओलांडला आहे. परकीय गुंतवणूकीचे 'जागतिक केंद्र' (Global Destination) म्हणून भारताची नव्या जगाला झाली असून अर्थव्यवस्थेची सर्वच आघाडयांवरून सुरू आहे. नेत्रदिपक कामगिरीमुळे हे शक्य झाले आहे.

**महासत्तेचे सामर्थ्य :—**

गरीब आणि विकसनशीलन देशांचे नेतृत्व करणारा देश म्हणून भारताची आजही ओळख असली तरी सध्या अमेरिका व चीन नंतर महासत्तेचे सामर्थ्य असलेला देश म्हणून भारताचा उल्लेख केला

जातो. १९९० च्या दशकापर्यंत ५% च्या जवळपास असलेला विकास दर २००५–०६ मध्ये ९.२% इतका इतका वधारला आणि आज तो ५% च्या आसपास आहे. परंतू २०१४–१५ पासून विकास दर वाढीची अपेक्षा आहे. जागतिक मंदीच्या काळात अमेरिकेसह प्रगत देशांना 2 ते ३% च्या वर वृध्दीचा दर गाठता आला नाही तेथे भारत मात्र दोन अंकी विकास दइारकडे झेपावला आहे. ही बाब भरताचे महासत्तेचे सामार्थ्य असल्याचेच दर्शक आहे. जगातील पहिल्या १० उद्योगप्रधान देशांमध्ये भारताचा समावेश होत असून कार्पोरेट क्षेत्राची जोरदार कामगिरी या मागे आहे. भारतीय उद्योजकांनी अनेक विदेशी कंपन्या खरेदी करून व व्यवस्थापकीय प्रमुखाची जबाबदरी स्वीकारून भारताच्या महासत्तेच्या सामर्स्थ्यावर शिक्कामोर्तब केला आहे. साम, दाम, दंड, भेद या कूटनीतींचा वापर न करता महासत्तेचे सामर्थ्य निर्माण होते याचा आदर्श जगापुढे ठेवला आहे. भारतातील बहुमोल नैसर्गिक साधनधन, मनुष्यबळाची जागतिक कुशलता, मोठी ग्राहक बाजारपेठ, क्रयशक्तीतील वाढ, नियंत्रित वित्तीय तुट, भांडवलाची गतिशिलता व भांडवल आकृष्ट करण्याची वाढती क्षमता, प्रयोगशील आणि व्यापारी शेतीकडे वाढता कल, निर्यात वृध्दी व विविधीकरण, संषोधन, वैज्ञानिक प्रगती, तंत्रनाचा प्रसार या सर्व निकषांचा विचार करता भारत 'उदयोन्मुख महासत्ता' म्हणून पुढे येत आहे.

**सेवा प्रधानतेकडे वाटचाल :–**

आधुनिक काळात अर्थव्यवस्थेची वाटचाल सेवाप्राधनतेकडे होणे ही विकासाची पूर्ण अट मानली जाते. जीडीपीत ५४% वाटा सेवा क्षेत्राचा असून भारताने विकासाची पूर्वअट पूर्ण केली आहे. आयटी, इन्फ्रास्ट्रक्चर, सुपरस्पेषॅलिटी आरोग्यसेवा, पर्यटन, वाहतूक, सौंदार्य–फॅषन, बॅकिंग सुविधा, तयार खाद्यपदार्थ इत्यादी क्षेत्रात मोठया प्रमाणात रोजगार निर्माण झाला असून एकूण सेवा क्षेत्र व्यापक बनत आहे. माहिती–तंत्रज्ञान क्षेत्रातील क्रांतीमुळे (IT Revolution) भारताने सेवा क्षेत्राच्या जोरावर जागतिक अर्थव्यवस्थत आपले स्थान निर्माण केले आहे. अमेरिकेतील 'सिलीकॉन व्हॅली' येथे आऊटसोर्सिंगच्या ४५% हिस्सेदार भारत आहे. या बाबी भारतीय अर्थव्यवस्था सेवा प्रधानतेकउे वाटचाल करीत असल्याची साक्ष देते.

**आर्थिक क्रांती :–**

अर्थव्यस्थे संदर्भात झालेल्या उत्क्रांतपूर्व बदलांचा सर्वसाधारणपणे 'आर्थिक क्रांती' असा उल्लेख केला जातो. भारतात कृषी उत्पादन वाढीशी संबंधीत 'हरितक्रांती' दुग्धजन्य उत्पादनाशी संबंधित 'धवलक्रांती', माहिती–तंत्रज्ञानाशी निगडीत 'नीलक्रांती' यासारख्या क्रांतीकारक सुधारणांमुळे अर्थव्यवस्थेत अमुलाग्र बदल घडून आले आहेत. यामुळे अर्थव्यवस्थेचे एकूण सामर्थ्य वाढले असून त्या

जोरावर भारत विविध क्षेत्रात स्वयंपूर्णतेच्या दिषेने वाटचाल करीत आहे. भारताचा जागतिक व्यापारात वाटा वाढत असून या वर्षाअखेरीज 320 अब्ज डॉलर इतकी उच्चांकी निर्यात केली आहे. थोडक्यात आर्थिक सुधारणांचा परिणाम म्हणून भारतात क्रांतीकारक आर्थिक बदल घडून येत आहेत.

**सारांश :–**

भारताने नवीन आर्थिक सुधारणांचा अवलंब करून अर्थव्यवस्थेचा तोंडवळा बदलण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. तरीही या सर्व बदलांचे लाभ दुर्बल–वंचित घटकांपर्यंत पोहचविण्यात अनेक अनेक अडचणी आहेत. मोठया प्रमाणात गरिबी आणि आर्थिक विषमता असल्याने ३७% लोकसंख्या हलाखीचे जीवन जगत आहे. गरिबी निर्मूलनाचा वेग कमी असल्याने गरिबीचा प्रश्न बिकट बनत असून दिवसाला 20 रूपये खर्च करू न शकनारी भारताची ७२ कोटी लोकसंख्या (सेन कमिटीच्या अहवालनावरून) नवीन सुधारणांचे फायदे घेऊ शकत नाही. हे वास्तव दुर्लक्षून चालणार नाही. नवीन सुधारणांच्या पर्वात शेतीक्षेत्रात देखिल अपेक्षित यश आपल्याला मिळाले नाही. आजही ५६% लोकसंख्या शेतीवर अवलंबून असून रोजगारनिर्मितीच्या, निर्यातीच्या आणि विकासाच्या संधी या क्षेत्रात अपेक्षेपेक्षा कमी प्रमाणात निर्माण झाल्या आहेत. देशाच्या जीडीपीत शेतीचा वाटा २२% असून, शेती क्षेत्रातील गुंतवणूक नाममात्र आहे. ग्रामिण भागात दरडोई उत्पन्न सरासरीपेक्षा कमी आहे. परिणामी कर्जाचा बोजा प्रचंड वाढत आहे. १९९३ ते २००३ या दहा वर्षात देशात एक लाखांहून अधिक शेतक–यांनी आत्महत्या केल्याचे सरकारी आकडेवारून दिसून येते. आत्महत्येचे लोण कापूस–सोयाबीन घेणा–या शेतक–यांपासून द्राक्ष, डाळींब व कांदा उत्पादक शेतक–यापर्यंत पोहचले आहे. १९९० मध्ये ३५% असलेले भूमिहीनांचे प्रमाण २०१० च्या अखेरीस ६०% पर्यंत पोहचले आहे. शेती हा प्राचीन व पारंपारीक व्यवसाय असूनही आजही 'अन्नसुरक्षा' आणि अन्नधान्य स्वयंपूर्णतः' हे कळीचे प्रश्न बनले आहेत. असंघटित क्षेत्रातील कामगारांचे रोजगार आणि वेतनदर यासंबंधीचे प्रश्न गंभीर बनत आहेत. या क्षेत्रात असुरक्षितता वाढत जाऊन मोठया प्रमाणात असंतोष निर्माण झालेला आहे. यावरून नवीन सुधारणांचे लाभ 'कॉमन मॅन' पर्यंत पोहचविण्याच्या मार्गात अनेक अडसर आहेत.

सध्याच्या नवीन आर्थिक सुधारणाच विकास प्रक्रियेच्या केंद्रस्थानी आहेत. भारतातील शेती, शेतकरी, ग्रामीण उद्योग, दुर्बल घटक, अनुसचित जाती–जमाती, आदिवासी आणि वंचित घटक या सर्वांचे हीत जोपासत नवीन सुधारणांना चालना दिल्यास त्याचे लाभ समानतेच्या तत्वावर सर्वांपर्यंत पोहचविता येतील. नवीन सुधारणा जरी तत्कालीन अपरिहार्यता म्हणून स्वीकारल्या असल्या तरी त्या

आज काळाची समस्या असल्या तरी त्या सोडविण्यासाठी आपल्याला नवीन सुधारणांना विरोध करण्याऐवजी बळ दयावे लागेल. सामाजिक आघाडीवरून गुन्हेगारी, स्त्रियांवरील वाढते अत्याचार, दहषवादी कारवाया, फटीर प्रवृत्तींचे लांगूनचालन, वाढत्या नक्षली हिंसा, उच्चपदस्थ आणि राजकारण्यांचा भ्रष्ट व्यवहार यांसारखे अनेक प्रश्न समोर येतात. अर्थात हे प्रश्न सदोष व्यवस्थेमुळे निर्माण झाले आहेत. नाण्याच्या दोन बाजू म्हणून विचार करतांना नवीन सुधारणा कार्यक्रम ही बाब वरचढ ठरत आहे. आर्थिक आघाडीबरोबरच सामाजिक आघाडी महत्वाची मानून सुधारणांना 'मानवी चेहरा' दिल्यास देश 'महात्मा' बनण्याचे स्वप्न वास्तवात येईल हेच खरं.

**संदर्भ ग्रथ :**

1. भारतीय अर्थव्यवस्था – श्रीधर देशपांडे
2. जागतिकीकरण आणि भारत – नलिनी पंडित
3. जागतिक अर्थव्यस्था – मधुसूधन साठे
4. काही आर्थिक काही सामाजिक – स. ह. देशपांडे
5. जागतिकीकरण – विनायक गोविलकर
6. अर्थात – अच्यूत गोडबोले